सामना उत्सव रविवार पुरवणी
गुरुजी
शोध
आपली प्रतिक्रिया कळवा

# कुबुद्धी सुबुद्धी

मानवाच्या सर्वंकष उत्कर्षाचं मुख्य कारण म्हणजे त्याला मिळालेली बुद्धीची देणगी. जेव्हा या परमेश्‍वरी देणगीत मानवी संकुचित व स्वार्थी विचारांची भेसळ होते, तेव्हा हीच बुद्धी कुबुद्धीचं रूप घेते. अध्यात्मात सर्व अनर्थांचं मूळ कारण म्हणजे ही कुबुद्धी होय! या कुबुद्धीमुळे साधकाच्या मनात सतत संशय, शंका निर्माण होत असतात.
श्रीमद्‌भगवद्‌गीतेत सुद्धा नववा अध्याय संपेपर्यंत श्रीकृष्णाने अनेकवार ‘मी सर्वत्र आहे’ असे सांगितले असतानादेखील अर्जुनाने, ‘हे भगवान, मी तुम्हाला कोणत्या कोणत्या स्वरूपात पाहू?’ असे विचारलेच. अर्जुनाने निदान आपली शंका प्रामाणिकपणे विचारून श्रीकृष्णापाशी अनन्य शरणागती तरी पत्करली. परंतु सामान्य मनुष्य मात्र संशयाच्या जाळ्यात गुरफटत राहतो आणि ‘संशयात्मा विनश्यति!’ असे श्रीकृष्णाने सांगितल्याप्रमाणे सत्कर्म करूनही केवळ या संशयबुद्धीमुळे आपल्या सत्कर्मफळांचा नाश करून घेतो. साधना करूनही त्याला अध्यात्मात यश मिळू शकत नाही, कारण त्याची बुद्धी ही कुबुद्धी झालेली असते, जी सतत काहीतरी तर्क-वितर्क करत असते.
शास्त्रामध्ये तर्काचेही तीन प्रकार सांगितले आहेत. कुतर्क, तर्क आणि वितर्क. जगातील यच्चयावत गोष्टींकडे संशयाने बघण्याची खूप लोकांना सवय असते, यालाच कुतर्क म्हणतात. व्यवहारात याची कित्येक उदाहरणे सापडतील. समजा एखाद्या मनुष्याने सेवेचा संकल्प केला आणि त्याप्रमाणे जर एखाद्या मंदिरात जाऊन मंदिर स्वच्छ असावं या हेतूने तेथे झाडू मारण्याची सेवा त्याने घेतली तर एखाद्याचा संशयात्मा लगेच कुतर्क करायला लागतो, ‘अरे, असा कोणी फुकट झाडू मारतो का? त्याला तिथे काहीतरी मिळत असेल, काही नाही तरी देवापुढे आलेलं गूळ-खोबरं तरी नक्की खात असेल तो!’ हा जो आहे तो कुतर्क! कुतर्काची ही सवय आपणा सर्वांमध्येच काही ना काही प्रमाणात असतेच. याच्या उलट तर्क म्हणजे कारणमीमांसा शोधणे. एखादा जर म्हणेल ‘ही सेवा हा करतोय, पण ती कशासाठी ते जाणून घ्यायला पाहिजे’, तर हा साधा सरळ तर्क झाला. अशा तर्कामध्ये ज्ञानाची इच्छा असते ज्यामुळे मनुष्य स्वत: जाऊन त्याला त्याच्या सेवेचं प्रयोजन विचारील. परंतु प्रयोजन जाणून घेतल्यानंतरही त्याविषयी नुसते तर्कामागून तर्क उभे करण्याची काहीजणांना सवय असते. त्यामुळे पदरात तर काही पडत नाहीच, शिवाय व्यर्थ विचारांमुळे नाहक शक्तीव्यय होतो. यासाठी खरा आवश्यक असतो तो वितर्क, म्हणजे विशेष तर्क! खरे तर हा वितर्क शब्दव्यवहारात ज्या अर्थाने वापरला जातो, तसा त्याचा अर्थ अपेक्षित नाही. वितर्क म्हणजे एखाद्या तर्काचं उत्तर शोधण्याकरता मनुष्य चौकशी करतो, सांगोपांग विचार करतो आणि मग त्या तर्काचं उत्तर शोधून काढून ते स्वीकारतो. कुतर्क आणि तर्क या दोन्हींचं निराकरण या विशेष तर्कामुळे होतं आणि तेव्हाच कुबुद्धी नाहीशी होते, सगळे संशय नष्ट होतात. आध्यात्मिक क्षेत्रात प्रगती करायची असेल तर ही कुबुद्धी निर्माण करणारे सर्व मोह, मद, मत्सर, लोभनामक प्रपंचात बांधणारे बंध काढून टाकावे लागतात.
समजा, एखाद्या भिकाऱ्याला मदत करण्याच्या उद्देशाने त्याला एक चारचाकी मोटार एखाद्या धनाढ्य व्यक्तीने दिली आणि तो भिकारी जर असा विचार करू लागला, ‘आता मला उन्हातान्हात उभे राहून भीक मागायला नको, आता मी गाडीत बसून भीक मागेन, तेवढेच माझे श्रम वाचतील!’ तर ही खरी कुबुद्धी! वस्तुत: एवढ्या आलिशान गाडीत बसून भीक मागितली तर आपल्याला कोणी भीक घालेल का, हा सारासार विचारसुद्धा या कुबुद्धीमुळे सुचत नाही. अशा क्षुद्र मोहांमध्ये अडकल्यामुळे सर्व देणारा साक्षात ईश्‍वर जरी समोर आला तरी माणसाचा त्याच्यापुढे फाटकी झोळी पसरण्याचा स्वभाव जात नाही, याला कारण म्हणजे ही कुबुद्धी! सामान्य साधकदेखील बहुतांश वेळी काहीतरी क्षुल्लक प्रापंचिक स्वार्थ ठेवून साधना करत असतो. ‘मी एवढा जप करतो, माझं अमुक काम होऊ दे, मी हे व्रत करेन मग माझं तमुक काम होऊ दे’ अशी अपेक्षा ठेवून सत्कर्म करतो. काहीवेळा त्या तपाचरणामुळे त्याला अपेक्षेनुसार प्राप्तीसुद्धा होते, परंतु त्याच्या अशा मर्यादित हेतूमुळे तो आत्मज्ञानापर्यंत पोहचत नाही. अशा प्रकारची व्यापारी वृत्ती ठेवून स्वार्थी अपेक्षेने केलेल्या साधनेला अध्यात्मात ‘कुसीद बुद्धी’ असं म्हणतात. हासुद्धा कुबुद्धीचाच एक प्रकार आहे. परंतु मानवी जन्माचे अंतिम साध्य प्राप्त करायचे असेल, तर अध्यात्मात अशी व्यापारी वृत्ती चालत नाही.
ज्याच्या तपाचरणामागे परमार्थ नामक व्यापक स्वार्थाखेरीज अन्य काहीही क्षुद्र स्वार्थ नसतो, तोच खरा भक्त अथवा साधक असतो. त्याची दृष्टी सदैव एकाच ध्येयावर खिळलेली असते आणि त्याचं त्याला योग्य ज्ञानही असतं की, ‘ईश्‍वरी तत्त्व किंवा ब्रह्मतत्त्व आणि मी एकच आहोत; फक्त ते समजण्यासाठी त्याची अनुभूती घेण्यासाठी आपल्याला भक्ती करायची आहे, सत्कर्म करायचे आहे’ या निरपेक्ष भावालाच ‘अकुसीद वृत्ती’ असं म्हटलं जातं आणि अशी वृत्ती सुबुद्धीमुळे निर्माण होते. जेव्हा सगळे मोह, सगळ्या अपेक्षा मनातून हद्दपार होतात तेव्हा मनुष्याच्या बुद्धीचं सुबुद्धीमध्ये रूपांतर होते आणि आत्मतत्त्वाचं आकलन होण्यासाठी तो खऱ्या अर्थाने पात्र होतो.
मनामध्ये खात्री आणि निष्ठा बाळगून नि:स्वार्थ भावनेने केलेले सत्कर्मच मनुष्याला आत्मस्वरूपाचा साक्षात्कार घडवत असते आणि असे सत्कर्म करण्याची प्रेरणा कुबुद्धीचं रूपांतर सुबुद्धीमध्ये घडल्याशिवाय मिळत नाही.

- बापट गुरुजी

After 3rd Quarter Results
Ads by Guruji



Ads by Guruji

PRE-BUDGET RALLY